ISBN -978-93-84309-11-4

SAVITRIBAI PHULE
PUNE UNIVERSITY, PUNE

NAAC Accreditation'A' Grade

Junnar Taluka Shivner Shikshan Prasarak Mandal's

## Shri Shiv Chhatrapati College

*Bodkenagar, Junnar (Pune)*

**National Seminar on**

# Status of Judicial Activism in India

Editor -In-Chief
**Prof. Rahul Pandit**

Principal
**Dr. Bhaskar Shelke**



ISBN -978-93-84309-11-4

**B.C.U.D. Savitribai Phule Pune University, Pune**

**Sponsored**

**Junnar Taluka Shivner Shikshan Prasarak Mandal's**

# Shri Shiv Chhatrapati College

*Bodkenagar, Junnar (Pune)*

***Department of Political Science***
***organized***

**National Seminar on**

# Status of Judicial Activism in India




**Date : 12th & 13th February 2016.**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| 1 | Public Interest Litigation: Its Use and Misuse | Dr. Ketan Govekar | 1-3 |
| 2 | Judicial Activism in India and Principles of Statutory Interpretation and Income Tax Act | Prof. Dr. Jainuddin R. Mulla | 4-10 |
| 3 | Carrying Out A Mandate Nhrc & Judiciary | Dr. Subrhansu S. Bahinipati | 11-14 |
| 4 | Changing Political Scenario & Judicial Activis | Dr. Saroj K. Mohapatra<br>Prof. Banamali Behera | 15-18 |
| 5 | Judicial Activism in India | Dr. Ajay Patil | 19-20 |
| 6 | Protection of Human Rights & Role of Judiciary | Mr. Bhong S.A. | 21-22 |
| 7 | A Review Of Judicial Activism In India | Anil K. Madhale | 23-25 |
| 8 | Human Rights, Society and Social Justice | Dr. Chandrakant R. Mandlik | 26-28 |
| 9 | Judiciary and Human Rights | Dr. V. D. Awari (HOD) | 29-30 |
| 10 | Context of Judicial Activism in India | Dr.Wahida Shaikh | 31-33 |
| 11 | Protection of Human Rights and Role of Judiciary | Dr. Neeta Bokil | 34-36 |
| 12 | Status Of Judicial Activism In India | Prof. Suresh S. Muluk | 37-39 |
| 13 | "Judicialjudgments And Social Utility With Special Reference To John Galsworthy's Play –j Justice (1910)" | Prof S. K. Joshi | 40-41 |
| 14 | Dr. Babasaheb Ambedkar's Perception In Social Justice And Role Of Judiciary | Prof. Nilesh C. Adhav | 42-44 |
| 15 | Emerging Sports Law In India | Anil Kisan Bade | 45-47 |
| 16 | Public Interest Litigation And Role Of Judiciary | Mrs. Preeti T. Pawar | 48-52 |
| 17 | Title : Status Of Judicial Activism In India | Dr. Tanpure S. Shamrao | 53 |
| 18 | Increasing Role Of Judiciary In Protection Of Human Rights | Sarika P. Shinde(ll.m.net) | 54-56 |
| 19 | Judicial Activism In India: Origins, Meaning, Causes And Lessons | Nirmal E.s. | 57-58 |
| 20 | Dr. Babasaheb Ambedkar's Thoughts On Judiciary | Prof. Satish Raste | 59-60 |
| 21 | Judicial Activism In India | Mrs. Supekar Vaishali P. | 61-63 |
| 22 | Judicialactivism Under The Indianconstitution | Prof. Dudhkawade S.R. | 64-65 |
| 23 | Judicuial Activism In India | Dr. Nandkishor N. Ugale | 66-68 |
| 24 | Judicial Activism In India: Transformative Approach | Ajay Sonawane | 69-71 |
| 25 | Dr. Ambedkar's Views On Higher Judiciary: Special Reference To 15th Constitutional Amendment | Sachin B. Pathare | 72-75 |
| 26 | Human Right's Of Agricultural Labour's Protected By Indian Judiciary: A Study | Hangarge S. Damodhar | 76-79 |
| 27 | Role Of Indian Judiciary In Protection Of Human Rights Of Women | Anna Devman Dhawale | 80-83 |
| 28 | संसद आणि न्यायालय संबंध : एक निरीक्षण | डॉ. बळीराम दत्तात्रय कटारे. | 84.88 |
| 29 | भारतीय संसद आणि न्यायालयीन सकियता | प्रा. डॉ. राजेंद्र ज्ञानोबा शिंदे | 89.96 |
| 30 | बदलत्या राजकीय परिक्षेत्रात न्यायालयीन सकियता | प्रा. डॉ. एकनाथ खांदवे | 97.98 |
| 31 | संसद व न्यायपालिका संबंध न्यायालयीन सक्रीयतेच्या संदर्भात एक दृष्टीक्षेप | प्रा. डॉ. एस.एम. वाघ | 99.102 |
| 32 | "मानवी हक्क संरक्षणातील कायद्याची भूमिका" | डॉ. बी. डी. तोडकर | 103.108 |
| 33 | न्यायालयाची सकियता आणि समतेचे मुलय | प्रा. संजय पंढरीनाथ गायकवाड | 109.112 |
| 34 | भारतीय राजकारण आणि न्यायालयीन सकियता | डॉ. आरगडे अंबादास रोहिदास | 113.116. |
| 35 | भारतीय न्यायालयीन सक्रियता | प्रा. भरत राठोड (सहा. प्राध्यापक) | 117.121 |
| 36 | न्यायालयीन सकियता एक समिक्षण | डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील | 122.124 |
| 37 | न्यायालयीन सकियता | प्रा. हारदे चंद्रकांत गोरक्षनाथ | 125.131 |

ISBN -978-93-84309-11-4

# भारतीय न्यायालयीन सक्रियता

**प्रा. भरत राठोड (सहा. प्राध्यापक)**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,
प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, आकुर्डी, पुणे—४४

**1.गोषवारा (Abstract) :**

आधुनिक लोकशाहीत कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या तीन शासन विभागाचे सत्ताविभाजनाच्या तत्त्वाद्वारे जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. या कोणत्याही विभागाने परस्परांच्या अधिकार क्षेत्रात हस्तक्षेप करु नये अशी तरतूद केलेली असली तरी या तीन विभागापैकी एखादा विभाग आपल्याला सोपविलेले विहित कार्य योग्य पद्धतीने पार पाडू न शकल्यास शासनकारभारात असंतुलन व अनागोंदी निर्माण होवू शकते. १९ व्या शतकाच्या शेवटी जगातील इंग्लंड, अमेरिका व २० व्या शतकाच्या अंतिम दशकात तिसऱ्या जगातील लोकशाही राष्ट्रांत हीच प्रक्रिया घडलेली दिसते. भारतातही कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाच्या कार्यातील असंवेदनशीलता, संसदीय लोकशाहीचा ऱ्हास, पर्यावरण संवर्धन, वाढता भ्रष्टाचार, दहशतवाद, लोकशाहीचे गुन्हेगारीकरण, सामान्य जनतेला राजकीय लोकशाहीत अल्प सहभाग, गुन्हेगारांना दीर्घकाळ बंदिस्त ठेवणे व त्यावर अत्याचार करणे या सर्व बाबींमुळे सामान्य जनता आपल्या हक्क व अपेक्षा पूर्तीसाठी न्यायालयाकडे दाद मागू लागली. या मागणीतूनच न्यायमंडळाने तांत्रिक व अतिकायदेशीर दृष्टिकोणाचा त्याग करुन जनतेच्या हितार्थ शासन प्रशासनाच्या क्षेत्रात सक्रिय होवू लागली. यातुनच १९८० च्या दशकात भारतीय न्यायीक व्यवस्थेत न्यायालयीन सक्रियता या संकल्पनेचा उदय झालेला आहे.

**2.प्रस्तावना ( Introduction):** न्यायालयीन पुनर्विलोकनाबरोबरच न्यायालयीन सक्रियतेलाही न्यायालयीन निर्णय प्रक्रिया व कामकाजात अत्यंत महत्त्व आहे. न्यायालयीन सक्रियतेला (Judicial Activism) न्यायालयीन 'क्रियाशीलता' व 'कार्यशीलता' असेही म्हणतात. जेव्हा एखादे कायदे राज्यघटनेतील कायद्यांना बदलत्या स्वरुपात संदर्भ देत असतात तेव्हा न्यायालयीन सक्रियतेचा प्रत्यय येतो. कायद्यातील तरतुदी सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीच्या संदर्भात बदलत जावून लोकांच्या हक्काची व्याप्ती वाढते.

न्यायालयीन सक्रियतेचे मूळ हे इंग्लंडमधील सामान्य कायदा (कॉमन लॉ) मध्ये दिसून येते. हा कायदा न्यायालयीन सक्रियतेतूनच निर्माण झालेला आहे. इंग्लंडमध्ये कायद्यांची निर्मिती रुढी, परंपरेवर आधारित असून त्या रुढी, परंपरेला संसद कायद्यात रुपांतर करते. न्यायालयीन सक्रीयतेच्या प्रक्रियेत कायद्याचे अर्थ कसे बदलतात हे अमेरिकेतील वर्णद्वेषाविरुद्धच्या दोन खटल्यांतील निर्णयावरुन समजते. १८९६ मध्ये प्लेसी विरुद्ध फर्ग्युसन खटल्यातील निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने 'समान पण निराळी वागणूक' या तत्त्वाला मान्यता दिली. एका कृष्णवर्णीय व्यक्तीने गौरवर्णीयांच्या रेल्वेच्या डब्यातून प्रवास केल्याबद्दल त्याला डब्यातून बाहेर काढले व त्याला शिक्षा केली. त्याला मिळालेल्या वागणुकीविरुद्ध कृष्णवर्णीय व्यक्तीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. कायद्यापुढे सर्वांना समान संरक्षण या तरतुदीचे उल्लंघन झाले असे अर्जदाराचे म्हणणे होते. विरुद्ध बाजूचे म्हणणे असे की, समान वागणूक म्हणजे एक वागणूक नव्हे. निराळ्या सोयी असूनही जर त्या सोयी सवलती समान असतील तर 'समान वागणूक' व 'समान संरक्षण' या तत्त्वाचे उल्लंघन होत नाही. सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तीवाद मान्य करुन 'समान पण निराळी वागणूक' या तत्त्वाला मान्यता दिली. काळे व गोरे लोकांचे डबे वेगळे असले तरी त्यातील सोयी सुविधा सारख्याच आहेत म्हणून येथे समानतेच्या तत्त्वाचे उल्लंघन होत नाही असे सर्वोच्च न्यायालयाने मत मांडले.

१९५४ साली ब्राऊन विरुद्ध बोर्ड ऑफ एज्युकेशन या खटल्यात कृष्णवर्णीय मुलांसाठी वेगळ्या शाळांच्या बाबतीत प्रश्न निर्माण झाला होता. तेव्हा सर्वोच्च न्यायालयात मानसशास्त्रज्ञांनी

ISBN -978-93-84309-11-4

[illegible] दिली की, कृष्णवर्णीय मुलांना वेगळी वागणूक किंवा वेगळी शाळा दिली तर त्यांच्यात न्यूनगंडाची भावना निर्माण होईल. समान परंतु वेगळी वागणूक या तत्वाविरुद्ध कृष्णवर्णीय लोकांनी दावा केला आणि 'समान परंतु वेगळी वागणुक' हे तत्व समानतेच्या तत्वांशी सुसंगत राहू शकत नाही असे मत त्यांनी मांडले. सर्वोच्च न्यायालयाने त्यांचे मत मान्य करुन सर्व शाळांमध्ये काळ्या–गोऱ्या वर्णाच्या मुलांना एकत्रित प्रवेश दिला पाहिजे असा निर्णय दिला. या दोन खटल्यांवरुन न्यायालयीन सक्रियतेच्या प्रक्रियेतून कायद्याचा अर्थ कसा बदलत जातो हे समजते. भारतात १९८० नंतर समाज व लोकहिताच्या याचिका टाकण्यात येऊ लागले. त्यातुन १९९० नंतर न्यायालयीन सक्रियतेची पायाभरणी झाली. जनहित याचिका श्रीमती इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्या राजकारणाला पोषक असल्यामुळे त्या दोघांना संसदीय सार्वभौमत्वाला धोका वाटला नाही. न्यायालयीन सक्रियतेचा भर नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण देण्यावर होता. गरीब, वंचित समाजाच्या हक्कांचे राज्यसंस्थेपासून उदा. पोलिसांचा छळ, बलात्कार, तुरुंगात कैद्यांना मिळणारी अमानुष वागणूक, पर्यावरणाचे संवर्धन, आरक्षण, अत्याचार, दहशतवाद इ. प्रकरणी संरक्षण देणे ही जबाबदारी न्यायालयांनी घेतली. यातुनच न्यायालयांनी आपली अधिकारक्षेत्रे अधिक व्यापक केली आहेत.

**3.संशोधन पद्धती :**

**3.1.शोध निबंधाचे महत्त्व (Significance of the Research Paper)**: भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या शासन विभागांची निर्मिती करुन सामाजिक, आर्थिक, राजकीय बरोबरच जनतेचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला. नंतरच्या काळात राज्यघटनेतील मूलभूत अधिकारावर अतिक्रमण होवू लागल्याने सामान्य लोक न्यायालयात जावू लागले. लोकांच्या हितार्थ न्यायालये निर्णय देवू लागली. यातूनच न्यायालयीन सक्रियतेचा उदय झाला. न्यायालयीन सक्रियतेचा अर्थ व संकल्पना, भारतीय न्यायालयीन सक्रियतेची उदाहरणे व निर्णय, भारतीय लोकशाहीवर झालेल्या सकारात्मक व नकारात्मक प्रभावाचे अध्ययन करण्यासाठी या शोध निबंधाचे महत्त्व आहे.

**3.2.शोध निबंधाची उद्दिष्टे (Objectives of the Research Paper)**: प्रस्तुत शोधनिबंधात विषयाच्या अनुशंगाने पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. 1. भारतीय न्यायालयीन सक्रियता संकल्पना अभ्यासणे 2. निवडक न्यायालयीन सक्रियतेची उदाहरणे अभ्यासणे. 3. भारतीय लोकशाहीवरील सकारात्मक व नकारात्मक प्रभावाचा अभ्यास करणे.

**3.3.गृहीतके (Hypothesis)** : 1. घटनेतील तरतुदी व जनहित याचिकेच्या माध्यमातून न्यायालयीन सक्रियतेचा उदय झाला आहे. 2.न्यायालयीन सक्रियतेतून मूलभूत अधिकारांचे संवर्धन झाले आहे. 3. न्यायालयीन सक्रियतेतून सामाजिक व आर्थिक लोकशाहीची स्थापना झाली आहे.

**3.4.शोध निबंधाची पद्धत (Research Methodology of Research Paper)** :प्रस्तुत अध्ययनात विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**3.5.तथ्य संकलन (Data Collection)** : प्रस्तुत शोध निबंधासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला आहे.

**4.न्यायालयीन सक्रियतेचा अर्थ (Meaning)**: न्यायालयीन सक्रियता म्हणजे 'राज्यघटना, कायदा आणि आपल्या जबाबदारीला कायद्याच्या चौकटीच्या बाहेर जाऊन सामाजिक, आर्थिक परिस्थिती आणि सामाजिक, आर्थिक न्यायाच्या आवश्यकतेला डोळ्यासमोर ठेवून राज्यघटना आणि कायद्याची रचनात्मक व्याख्या करुन सामान्य लोकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी निरंतर प्रयत्नशील राहणे, याला न्यायालयीन सक्रियता असे म्हणतात.'

न्यायमुर्ती पी. एन. भगवती यांनी १९८२ मध्ये म्हटले होते की, सर्वोच्च न्यायालयाने मागील दोन वर्षात सामाजिक, आर्थिक परिस्थितीला डोळ्यासमोर ठेवून कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ व

ISBN -978-93-84309-11-4

न्यायमंडळ या सर्व संस्थांमध्ये सक्रिय दृष्टिकोणाचा अवलंब केला आहे.

**5.भारतीय लोकशाही व न्यायालयीन सक्रियता (Indian Judicial Activism):**

भारताने ब्रिटीशांशी दीर्घकाळ लढा देवून स्वातंत्र्य मिळवले. राज्यघटनेच्या निर्मितीतून संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केला. कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ या शासन यंत्रणेची निर्मिती करुन त्यांना स्वायत्तता देण्यात आली. संसदेकडून कायद्याची निर्मिती, कार्यकारी मंडळाकडून कायद्याची अंमलबजावणी, तर न्यायमंडळ कायद्याचे अर्थ लावून योग्य निर्णय देत असते. अशी त्यांच्या कार्याची विभागणी आहे. घटनेतील ५ व ६ व्या भागात कलम १२४ ते १४६ मध्ये न्याय व्यवस्थेबद्दल तरतूद केलेली आहे. घटनेतील नियमानुसार कार्य चालते किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी घटनेने न्यायालयावर टाकली आहे. भारतीय घटनेनुसार भारतीय नागरिकांना कलम १२ ते ३५ नुसार मूलभूत अधिकार प्राप्त झाले आहेत. घटनेच्या कलम ३२ मध्ये न्यायालयांना मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी करावयाच्या उपाययोजनेबाबत सक्षम करण्यात आले आहे. कलम ३२ मधील घटनात्मक उपाययोजनेच्या अधिकाराचे महत्त्व विषद करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''कलम ३२ ही तरतूद घटनेतून काढून टाकली तर घटना शून्यवत होईल.''

कलम ३२ मध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, भारतातील समाज घटक किंवा व्यक्तीवर अन्याय झाला असेल किंवा त्याच्या मूलभूत हक्कांवर गदा आली असेल तर त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागता येते. मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, प्रतिशोध, अधिकारपृच्छा, उत्प्रेक्षण असे आदेश देण्याचा अधिकार घटनेने सर्वोच्च न्यायालयाला दिला आहे. न्यायालयाने आपल्या कार्यात सक्रियता दाखवून व स्वत: पुढाकार घेवून समाजातील अन्यायग्रस्त लोकांना न्याय देण्याची कृती म्हणजे न्यायालयीन सक्रियता होय. भारतात प्रामुख्याने १९८० नंतरचा काळ न्यायालयास सक्रिय करताना दिसून येतो. सार्वजनिक हिताला फार बाधा होत असेल अशा वेळी न्यायालय सक्रियतेच्या माध्यमातून निर्णय देते. यासाठी समाजाच्या वतीने कोणतीही व्यक्ती न्यायालयात धाव घेवू शकते.

**6.न्यायालयीन सक्रियतेची काही निवडक उदाहरणे :** **1.**भ्रष्टाचार (उच्च पदस्थ लोकांच्या) प्रकरणी सरकारने सी. बी. आय. अधिकाऱ्यांच्या केलेल्या बदल्या अवैध ठरवून रद्द केल्या. **2.**गंगा नदी प्रदूषण प्रकरणी कानपूरमधील २९ चर्मोद्योग बंद करण्याचा आदेश सरकारला दिला. **3.**समान काम समान वेतनाद्वारे राज्यसरकारला मार्गदर्शक तत्वे अंमलबजावणीचे आदेश दिले. **4.**१९६७ मूलभूत अधिकार बदल करण्याचा अधिकार संसदेस नाही असा आदेश दिला. **5.** १९७३ केशवानंद भारती खटल्यात संसदेला संविधानाच्या मूलभूत आराखडयात बदल करण्याचा अधिकार नाही हे स्पष्ट केले.

**6.**विनर्वामील्स १९८० खटल्यात लोकतंत्र, स्वातंत्र्य, संघराज्य, कायदा शासन मूलभूत अधिकार इ. भाग न्यायालयीन पुनर्विलोकनाद्वारे संविधानाचा मूलभूत आराखडा मानले. **7.**मागासवर्गीय २७% आरक्षण राष्ट्रपती अध्यादेश (१९९०, १० ऑ.) सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरविला. **8.**ताजमहालच्या परिसरातील प्रदूषण करणारे उद्योग, १५ वर्षापुर्वीचे जुने चारचाकी वाहन परवाने रद्द चा आदेश दिला. **9.**इंद्र सहानी' विरुद्ध भारत सरकार खटल्यात राखीव जागा आरक्षणाच्या निर्णयाबाब न्यायालयाने सक्रिय राहून जात हा आरक्षणाच्या निष्कर्षापैकी एक असू नये, राखीव जागा एकूण जागाच्या अर्ध्याहून अधिक असू नये असा निर्णय १९६३, १९९२ साली मंडल आयोगाच्या शिफारशीला मान्यता देताना न्यायालयाने सक्रियता दाखविली. **10.**शिला बोरसे यांनी मुंबईतील महिला कैद्यांना कस्टडी हिंसेला सामोरे जावे लागते याविरोधी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली न्यायालयाने महाराष्ट्र राज्य सरकारला महिलांचे कस्टडीतील हिंसा थांबविण्याचे आदेश दिले. **11.**विशाखा विरुद्ध राजस्थान सरकार केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने महिलांची कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक शोषण थांबविण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली.

ISBN -978-93-84309-11-4

12.सर्वोच्च न्यायालयात सक्रियतेद्वारे निर्णय घेताना दिल्लीतील ऑटो रिक्षा व बस यांना प्रदूषण थांबवण्यासाठी CNG वापरण्याचे आदेश दिले. 13. बंधुआ मुक्ती मोर्चा विरुद्ध भारत सरकार खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने मजुरांना त्यांच्या कामाचे योग्य वेतन देण्याचे आदेश दिले. 14. १९९४ मध्ये ३५६ कलमनुसार राज्य सरकारला बरखास्त करण्याचा आधार धर्म निरपेक्षतावर आहे असा निर्णय दिला यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रपतीने ३५६ कलमाचा वापर करुन राजस्थान, मध्यप्रदेश, हिमाचलप्रदेशातील भाजप सत्ता मंत्रीमंडळे बरखास्त केली व सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय वैध ठरविला होता. यामध्ये धर्मनिरपेक्षता हा संविधानाचा मूलभूत ढाचा आहे असे सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. 15. ११ मार्च १९९४ मध्ये न्या. एस. आर. पान्डियन यांनी राष्ट्रपती राजवट निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. त्याचबरोबर घटकराज्य विधान सभा भंग करण्याला कायद्याचा आधार नसेल तर न्यायालय विधान सभेबाबत 'status qus' चा अधिकार असेल असा निर्णय दिला. 16.'परमानंद कटारिया विरुद्ध भारत सरकार' खटल्यात अपघाताच्या इमर्जन्सी रुग्णाचा जीव वाचविण्यासाठी हॉस्पीटलमध्ये अॅडमीट करण्यासाठी कोणत्याही औपचारिकतेची गरज नसल्याचा निर्णय दिला व इमर्जन्सी रुग्णाला तात्काळ सेवा उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले.

17. दहशतवाद संदर्भात कसाब, अफजलगुरु, तसेच याकुब मेननच्या फाशीच्या शिक्षेसंदर्भात सर्वोच्च व इतर न्यायालयीन प्रक्रिया अधिक सक्रिय दिसून आली. याकुब मेनन संदर्भात सर्वोच्च व उच्च न्यायालये मध्यरात्रीपर्यंत चालू होती. 18. 'हुसेनरा खातुर विरुद्ध बिहार राज्य' खटल्यामध्ये एखाद्या व्यक्तीची आर्थिक स्थिती चांगली नसेल तर तिला मोफत कायदेविषयक सल्ले देण्याचे व त्याची सुटका करण्याचे आदेश दिले. 19. निवडणूक मतदारांना उमेदवार पसंत नसेल तर **'Nota- nan of above'** हा नकारात्मक मत देण्याचा निर्णय दिला. 20. अंध--अपंगांना नोकऱ्यातील ३% अनुशेष ३ महिन्यात तात्काळ भरण्याचे आदेश दिले. 21. पर्यावरण संवर्धनासाठी वेळोवेळी जनहितार्थ निर्णय न्यायालये देत आहेत. याचाच भाग म्हणून सर्वोच्च न्यायालयाने जानेवारी २०१६ च्या दिल्ली सरकारच्या हवा प्रदूषण नियंत्रण संदर्भातील 'ऑड इन वन' या योजनेचे समर्थन करताना विरोधकांची याचिका फेटाळली.

**7.भारतीय लोकशाहीवरील सकारात्मक व नकारात्मक प्रभाव:** भारतीय न्यायीक व्यवस्थेत १९८० नंतर उदयास आलेल्या न्यायीक सक्रियतेने सामान्य जनतेला न्याय मिळण्यास व भारतीय राज्यघटनेमधील मूलभूत अधिकार मार्गदर्शक तत्वे व सामान्य जनतेचा विकास करण्यासाठी न्यायीक सक्रियता एक संरक्षण कवच म्हणून समोर आलेली दिसून येते. न्यायालयीन सक्रियतेमुळे न्यायव्यवस्था, भारतीय लोकशाहीवर सकारात्मक व नकारात्मक प्रभाव पडलेला आहे. भारतीय लोकशाहीवरील सकारात्मक व नकारात्मक प्रभाव पुढीलप्रमाणे पडलेला दिसून येतो.

**7.1.सकारात्मक प्रभाव:** 1. मूलभूत अधिकारांचे संरक्षण: भारतीय राज्यघटनेमधील भाग ३ मध्ये मुलभूत अधिकार जनतेला दिलेले आहेत याचे संरक्षण करण्याची जबाबदारी घटनेने न्यायपालिकेवर सोपविलेली आहे, असे असले तरी मुलभूत अधिकारांचे अतिक्रमण व उल्लंघन करणे शासन व समाजघटकांकडुन वेळोवेळी झालेली आहे अशा परिस्थितीत न्यायालयीन सक्रियता नागरिकांच्या अधिकाराचे संरक्षण करण्यास आजपर्यंत यशस्वी झाली आहे. 2. सामाजिक व आर्थिक न्यायाची स्थापना: न्यायीक सक्रियतेचा आणखी एक सकारात्मक प्रभाव म्हणजे सामाजिक आणि आर्थिक न्यायाची स्थापना करण्यास मदत झाली आहे. राज्यघटनेतील भाग ४ मध्ये सामाजिक आणि आर्थिक न्यायाची स्थापना करण्याची तरतूद आहे. कायदेमंडळ व कार्यपालिका यांच्या निष्क्रियतेमुळे सुरुवातीच्या काळात होवू शकले नाही. परंतु नंतरच्या काळात सामाजिक, आर्थिक न्यायाच्या स्थापनेसाठी न्यायालयाच्या सकारात्मक भूमिकेमुळे या दिशेने प्रयत्न सुरु झाले. न्यायपालिकेने अनेक खटल्यांचे त्वरित निर्णय देवून सामाजिक, आर्थिक न्यायाची स्थापना करण्यास प्राधान्य दिले आहे.

3. धोरणांची अंमलबजावणी करण्यास सहकार्य: न्यायीक सक्रियतेने केवळ कायद्यांचा अर्थ लावणे व

ISBN -978-93-84309-11-4

निर्णय देणे यावरच भर दिला नाही तर धोरणांची अंमलबजावणी करण्याराही सहकार्य केले आहे. वास्तविकता भारतात न्यायीक सक्रियतेचा परिचय धोरणांच्या अंमलबजावणीच्या आदेशाद्वारेच झाले आहे. भारतीय न्यायमंडळाने सरकारच्या कायदेमंडळापेक्षा कार्यपालिकेला अधिक सक्रिय करण्याचा प्रयत्न केला आहे. थोडक्यात न्यायीक सक्रियतेमुळेच प्रशासकीय सुधारणा झाली आहे.

**7.2.नकारात्मक प्रभाव:** **1.** न्यायीक हुकूमशाहीची : हुकूमशाही कोणत्याही प्रकारची असो ती लोकशाहीविरोधी असते. यामुळे याला अमानवीय, असामाजिक आणि अनैतिक म्हटले जाते. प्रचंड जनहित याचिकेमार्फत जो आज न्यायीक सक्रियतेचे प्राबल्य वाढले आहे ते भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या न्यायीक हुकूमशाहीच्या रुपात बघितले जाते असे अनेक विश्लेषकांनी मानले आहे. यामुळे भारतीय लोकशाहीवर न्यायीक सक्रियतेचा हा नकारात्मक प्रभाव दिसून येतो. **2.**नकारात्मक दृष्टिकोण वाढीस: न्यायीक सक्रियतेचा आणखीन एक नकारात्मक प्रभाव म्हणजे नकारात्मक दृष्टिकोणात होत असलेली वाढ हे होय. समकालीन परिस्थितीत कार्यकारी मंडळावर न्यायपालिकेचा इतका प्रभाव पडला आहे की प्रत्येक कार्य न्यायीक सक्रियतेतून पाहिले जात आहे. त्यामुळे प्रत्येक योजनेविरुद्ध स्थगिती दिली जात असताना दिसते. आज न्यायव्यवस्थेकडे नकारात्मक दृष्टिकोणातून पाहिले जात आहे. केंद्र सरकारही विरोधी पक्षांचे सरकारे असणाऱ्या घटक राज्यांत योजनांच्या विरुद्ध घटना व घडामोडीविरुद्ध न्यायालयात जात असताना दिसून येतील. **3.** जनहित याचिकांचे प्राबल्य: न्यायीक सक्रियतेचे आणखीन एक नकारात्मक प्रभाव म्हणजे जनहित याचिकांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे न्यायालयाचे कामकाज संथगतीने चालत आहे. आज न्यायव्यवस्थेसमोर प्रचंड जनहितार्थ याचिकांचा खच पडला आहे. ज्यामुळे सामान्य व अनिवार्य न्यायालयीन कामकाजावर विपरीत प्रभाव पडला आहे. यामुळे न्यायपालिका स्वतः गोंधळलेल्या अवस्थेत दिसून येत आहे. न्यायव्यवस्थेसमोर कोणत्या याचिकांचा स्वीकार करावा व कोणत्या याचिकांचा अस्विकार करावा हा प्रश्न पडला आहे. यातूनच जलद न्यायालये स्थापन केली जात आहेत.

**8.निष्कर्ष:**

१. भारतात खऱ्या अर्थाने सामाजिक, आर्थिक लोकशाहीबरोबरच कल्याणकारी राज्याची निर्मिती झाली आहे.
२. न्यायीक सक्रियतेमुळे जनतेच्या हक्कांची व्याप्ती वाढली आहे.
३. दहशतवाद, पर्यावरणाचे संरक्षण, भ्रष्टाचार, मागासवर्गीय आरक्षण या संबंधाच्या निर्णयामुळे सामान्य जनतेचा न्यायावरील विश्वास वाढला आहे.
४. न्यायालयीन सक्रियतेच्या माध्यमातून राजकारणाचे गुन्हेगारीकरण कमी करणे व संसदेतील गुन्हेगार खासदारांना निवडणुकीपासून दुर ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भसूची:**

१. फडीया बी. एल.(२००४), राजनीती विज्ञान, प्रतियोगिता साहित्य सिरीज, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा
२. पाटील बी.बी.(२००६), भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर
३. जाधव तुकाराम, महेश शिरपूरकर (२०११), भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रीया खंड १, द युनिक ॲकॅडमी, फर्ग्युसन कॉलेज गेटसमोर, शिरोळे रस्ता, पुणे
४. भोळे भास्कर लक्ष्मण (२०१०), भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीबुटर्स, नागपूर
५. देशमुख अल्का, भारतीय प्रशासन व राजकारण, साईनाथ प्रकाशन , नागपूर
६. लोटे रा.ज., भारतीय राज्य व शासनव्यवस्था, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर
७. कुमार अशोक, राजनीती विज्ञान, उपकार प्रकाशन, आगरा
८. युनिक बुलेटिन, अंक १० वा, द युनिक ॲकॅडमी, पुणे, मार्च २०१४

Junnar Taluka Shivner Shikshan Prasarak Mandal's

# Shri Shiv Chhatrapati College

**Bodkenagar, Junnar (Pune)**

Affiliated to Savitribai Phule Pune University (NAAC Accredited 'A' Grade)

BCUD, Savitribai Phule Pune University, Pune Sponsored

## A Two Day National Level Seminar On " Status of Judicial Activism in India"

**Organized by Department of Political Science**

## CERTIFICATE

*This is to certify that*

*Prof./Dr./Mr./Miss./Smt.* Prof. Bharat Z. Rathod

*of* Prof. Ramkrishna More College, Akurdi, Pune. *has participated in the Two Day National Level Seminar on the " Status of Judicial Activism in India " Organized by Department of Political Science of Shri Shiv Chhatrapati College, Junnar*

*held on 12th & 13th February 2016.*

*He/She Presented a paper / Delivered a speech entitled*

" भारतीय न्यायालयीन सक्रियता " *. Hence Certified.*

| | | | |
|---|---|---|---|
| Prof. Rahul Pandit | Dr. Jainuddin Mulla | Dr. Bhaskar Shelke | Adv. Sanjay Kale |
| Convener & H.O.D Dept.of Piolitical Science | Vice Principal | Offg. Principal | President J.T.S.S.P.M. |

Swara, Junnar Mob. 9087915416